# स्वच्छतेसाठी पुढे आले महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे हात



आवासच्या समुद्रकिनाऱ्याची सफाई करणारा विद्यार्थी वर्ग. (छाया-योगेश राणे)

अलिबाग, ३१ ऑक्टोबर (वार्ताहर) - सध्या देशभरात स्वच्छ भारत अभियान राबविले जात आहे. याच धर्तीवर आज तालुक्यातील आवास समुद्रकिनाऱ्यावर ठाणे येथील आर.जे.ठाकूर महाविद्यालय व जय भारत रात्र महाविद्यालय विद्यार्थ्यांनी साफसफाई केली.

अलिबाग कृषी पर्यटन विकास संस्था, आर.जे.ठाकूर वरिष्ठ महाविद्यालय ठाणे व जय भारत रात्र महाविद्यालय मुलुंड यांच्या संयुक्त विद्यमाने आवासचा समुद्रकिनारा साफ करण्यात आला.

दि.२८ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर २०१४ या दरम्यान महाविद्यालयातील सुमारे ८० विद्यार्थी विविध उपक्रम राबविणार आहेत. यामध्ये अलिबाग तालुक्यातील आगरसुरे गावातील रिसर्च सेंटरला भेट, ग्रामस्वच्छता, सर्पमित्राकडून सरपटणाऱ्या प्राण्यांविषयक माहिती, आवास समुद्रकिनाऱ्याची स्वच्छता, चोंढी आदिवासी वाडीवरील गरीब-गरजू नागरीकांना कपडे वाटप व विद्यार्थ्यांना शालेय वस्तू वाटप, वात्सल्य ट्रस्टला भेट व अनाथ मुलांना भेटवस्तू, मुशेत गावातील वनराई बंधारा, विविध ठिकाणी वृक्षारोपण, एड्स रोगथाम व आरोग्याविषयक जनजागृती, नागरीकांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन अशाप्रकारेच अनेक उपक्रम हे महाविद्यालयातील विद्यार्थी राबविणार आहेत.

या विविध उपक्रमांसाठी शिवसेनेचे विभागप्रमुख सुबोध राऊत, देवेंद्र राऊत आणि रक्षा माहिमकर यांनी सहकार्य केले आहे.